**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ११/०८/२०२२

**दि.१०/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६९२/२०२२ भा.दं.वि.कलम ३९५, ३८७, ४२७, ५०४, ५०६, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०९/०८/२०२२ रोजी २०.०० वा चे सुमा. राज स्नॅक्स अँन्ड स्वीट सेंन्टर जयभवानी चौक, रहाटनी लिंक रोड, रहाटणी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | १०/०८/२०२२ रोजी ०३.४५ वा. |
| फिर्यादी | :- | राहुल अरविंद गुप्ता वय २७ वर्षे धंदा- स्नॅक्स अँन्ड स्वीट सेंन्टर रा. अरुन नखाते यांची रुम, जयभवानी चौक, रहाटनी लिंक रोड, रहाटणी, पुणे. |
| आरोपी | :- | १)प्रसाद राऊत वय २५ वर्षे,<br>२)मनेश ऊर्फ मन्या कदम वय १८ वर्षे,<br>३)माऊली उपल्ले वय २१ वर्षे,<br>४)यश रसाळ वय २० वर्षं,<br>५)रोहित शिंदे ऊर्फ बॉन्ड,<br>६)सुनिल शेट्टी,<br>७)विजय तलवारे, व त्यांचेसोबतचे इतर तीन ते चार<br>**आ १ ते ४ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी राज स्नॅक्स अँन्ड स्वीट सेंन्टर या दुकानामध्ये येवुन सुनिल शेट्टी याने फिर्यादीचा भाऊ विवेक यास दहिहंडीच्या वर्गणीची मागणी करुन त्याचे हातातील वर्गणीचे पुस्तक विवेक याचेकडे दिले, त्यावेळी विवेक याने त्यांना १००/- रुपये देवु केले, परंतु शेट्टी याने ते घेण्यास नकार देवुन विवेक याचे कानाखाली मारुन ५००/- रु ची मागणी केली, त्यावेळी विवेक याने २००/- रु देवु केल्याने सुनिल शेट्टी व विजय तलवारे यांना त्याचा राग आल्याने त्यांनी विवेक यास हाताने मारहान करण्यास सुरवात केली, त्यावेळी फिर्यादी त्यांना समजाऊन सांगत असताना विजय तलवारे, सुनिल शेट्टी, माऊली उपल्ले, यश रसाळ, रोहित शिंदे ऊर्फ बॉन्ड, मनेश ऊर्फ मन्या कदम, प्रसाद राऊत, व त्यांचेसोबतचे इतर तीन ते चार लोक दुकानामध्ये घुसले व सर्वांनी मिळुन फिर्यादी तसेच फिर्यादीचा भाऊ विवेक व पवन यांना हाताने मारहान करुन, दुकानामधील स्नॅक्स काऊंटर खाली पाडले व स्वीट काऊंटरच्या काचा फोडुन, सुनिल शेट्टी व विजय तलवारे यांनी फिर्यादी व फिर्यादीचे भाउ यांना "तुम्हाला माहित नाही काय, आम्ही या ऐरियाचे भाई आहोत ते असे म्हणुन पुन्हा वरील सर्वांनी मिळुन आम्हाला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहान करुन सुनिल शेट्टी याने तेथेच पडलेल्या लोखंडी कडईने फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले. त्यावेळी आम्हाला वाचविण्यासाठी व आमची भांडणे सोडविण्यासाठी आलेल्या फिर्यादीचे आईलाही विजय तलवारे व सुनिल शेट्टी याने ढकलुन देवुन वडिलांनाही हाताने मारहान करुन, त्यांनी फिर्यादी यांचे खाली पडलेल्या स्नॅक्स काऊंटरचे गल्यातील दिवसभरामध्ये झालेल्या धंद्याचे अंदाजे १० ते १२ हजार रुपये जबरदस्तीने काढुन घेवुन, पुढील महिन्यापासुन दर महिन्याला हप्ता चालु करायचा, नाहीतर तुमचे आईवडिलांना मारुन टाकु अशी धमकी देवुन, दुकानासमोर आरडाओरडा करुन, दहशत माजवुन तेथुन सर्वजन निघुन गेले. म्हणून गुन्हा दाखल. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि अभय दाभाडे ९८८१२८९४८३ |

२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चाकण (महाळुंगे) १२७२/२०२२, भा.द.वि.कलम- ३५४,३५४(अ), १०९, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारणा) अधिनियम २०१६ चेकलम३ (१) (w) (i) (ii) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ३ ते ५ मे २०२२ रोजीचे दरम्यान १२:३० वा चे सुमारास
व दि.२०/०५/२०२२ रोजी ०८:३० वा चे सुमारास. मौजे-महाळुंगे, ता-खेड, जि-पुणेगावचे हद्दीमध्ये लेअर कंपनीचे मागे, अल्ट्रा टेक प्रा.लि.कंपनी मध्ये.

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी २२.११ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय-२८ वर्ष, जात बौध्द

आरोपी :- १)गोरख काटे, पुर्णनाव माहिती नाही, रा-चाकण, ताखेड पुणे
२)फिरोज शेख, पुर्ण नाव माहिती नाही,रा-चाकण, ताखेड पुणे
३)घनवट, कॉन्ट्रक्टर, पुर्णनाव पत्ता माहिती नाही,
३)तुपे, कॉन्ट्रक्टर पुर्णनाव पत्ता माहिती नाही
**अटक नाही.**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ यास फिर्यादी हया बौध्द समाजाचे असल्याचे माहिती असताना सुध्दा फिर्यादी यांना कंपनीमध्ये काम पाहिजे असेल तर फिर्यादीने त्याचे सोबत शरिरसंबंध ठेवावेत, असे बोलुन फिर्यादीकडे लैंगिक सुखाची मागणी करुन फियादीचे डावे हाताचा दंडाजवळ हाताने दाबुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यावेळी तेथे उपस्थित असणारे आरोपी क्र ३ व ४ यांनी आरोपी क्र १ यास, तुला आज माल खायला भेटणार, असे बोलुन आरोपी क्र १ याचे कृत्यास पाठबळ दिले. त्यानंतर फिर्यादी हया साईसिध्दी कॉन्ट्रक्ट मार्फत कंपनीमध्ये कामास रुजु होण्यास गेले असता आरोपी क्र २ याने फिर्यादीस, आरोपी क्र १ याने जे काही सांगितले आहे, ते तुला करावे लागेल, असे बोलुन फिर्यादीचे उजवे हाताचे दंडाजवळ हाताने दाबुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व आरोपी क्र १ याचे मागणी दुजोरा दिला. म्हणून गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोआ प्रेरणा कट्टे चाकण विभाग ९४२३४८८५९७

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- वाकड ६९३/२०२२ भादंवि कलम ३२६,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८,१४९, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कायदा कलम ३ व ७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०९/०८/२०२२ रोजी १८.३० वा चे सुमा. महाराष्ट्र टी सेंन्टर, कोकणेचौक, रहाटणी, पुणे.

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी ०४.२८ वा.

फिर्यादी :- प्रविण दिनकर देवकर, वय २१ वर्षे रा. डॉ. येवले चाळ, रामनगर कॉलनी क्र. ३, रामनगर, रहाटणी, पुणे. मुळगांव- संभाजीनगर, चिखली, जिल्हा बुलढाणा

आरोपी :- १)बबलु तलवारे वय-२० वर्षे
२)अजय कांबळे वय-२१ वर्षे
३)सुनिल कांबळे वय-१९ वर्षे
४)संदिप (पुर्ण नावपत्ते माहित नाहीत) व त्यांचेसोबत असणारे तीन ते चार जन सर्व रा. रहाटणी, पुणे.
**अटक नाही.**

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र सुमित शिंदे असे दोघेजन महाराष्ट्र टी सेंन्टर, कोकणेचौक, रहाटणी, पुणे. येथे चहा पिण्यासाठी गेलेलो असताना फिर्यादीचा भाऊ प्रथमेश याचे मित्र नामे आरोपीत १ ते ४ यांनी त्याचेसोबत इतर तीन ते चार मित्रांना बोलावुन घेवुन फिर्यादीचा भाऊ प्रथमेश

याचेबरोबर आण्णा भाउ साठे जयंतीचे मिरवणुकीत झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन आ.क्र.१, २ व ३ यांनी त्यांचेकडील कोयत्याने फिर्यादीचे पाठीवर व डोक्यात वार करुन फिर्यादीला गंभीर जखमी करुन, त्यांचेसोबत असणारे इतरांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहान करुन त्यांचे हातातील कोयते हवेत फिरवुन, आरडाओरडा करुन, परिसरात दहशत निर्माण करुन तेथुन पळुन गेले. म्हणुन गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि अभय दाभाडे ९८८१२८९४८३ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ७६०/२०२२ भा.दं.वि. कलम ४५४,३८० प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | १०/०८/२०२२ रोजी १२/०० वा ते १४/३० वाजण्याचे सुमारास प्लॅट नं-३०१, पाटील हाईटस, डी पॅलेसजवळ बावधन पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | १०/०८/२०२२ रोजी २०.२० वा |
| फिर्यादी | :- | महेंद्र गुणारामजी चौधरी वय-४२ वर्ष रा-प्लॅट नं-३०१, पाटील हाईटस, डी पॅलेसजवळ बावधन पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिक्‍ाणी फिर्यादी यांची पत्नी कन्यादेवी यांनी राहते घराचा दरवाजा व बेडरुमध्ीील कपाटाचा दरवाजा लॉक व बंद करुन गेलेले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने राहते घराचे दरवाजाचा कोयंडा कशाचेतरी साहयाने कट करुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील बेडरुममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा उचकटुन कपाटातील लॉकरमधील १)१,००,०००/-रु किंमतीचा सोन्याचा गंठण एकुण ४० ग्रॅम वजनाचा, २)१,००,०००/-रु किंमतीचा सोन्याचा बोरहार, राजस्थानी डोक्यावरील बिंदीचे डिझाइनचा, एकुण ४० ग्रॅम वजनाचा, ३)२५,०००/-रु किंमतीची एक सोन्याची चैन, १० ग्रॅम वजनाची, त्यावर लोचना असे नावाचे पेडंट असलेले. ४)२०,०००/-रु.किंमतीचे सोन्याची अंगठी ०३ नग, सोन्याची चमकी १ नग, एकुण ०८ ग्रॅम वजनाच्या ५)७५००/-रु किंमतीचा चांदीचा कंबरपटटा त्यावर साखळीची डिझाईन व खडे असलेले ०१ नग, व पायातील चांदीचे पटटया, ०२ नग त्यावर बदामी डिझाईन व त्यावर लाल व हिरव्या रंगाचे खडे असलेले, एकुण २५० ग्रॅम वजनाचे जु वा किं अं-,एकुण-२,५२,०००/-रु. किंमतीचे सोने व चांदीचे दागिने हे अप्रामाणिकपणे, लबाडीचे इरादयाने चोरी करुन नेले आहेत. म्हणुन गुन्हा दाखल |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि महादेव यलमार ९४२३२३९९४३ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ७६१/२०२२ भा.द.वि.क.३८१ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २६/०७/२०२२ रोजी ०१/०० वा.ते १०/०८/२०२२ रोजी ०२/३० वा.दरम्यान, १०४ टॉवर २३,ब्लुरिज हिंजवडी ता.मुळशी, जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | १०/०८/२०२२ रोजी २३.५९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय-२१ वर्षे, |
| आरोपी | :- | महीला आरोपी वय-१९ वर्षे रा.काळेवाडी फाटा सदगुरु कॉलनी थेरगाव पुणे<br>**सि.आर.पि.सी ४१ प्रमाणे नोटीस देण्यात आली** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हिचे १)२१,०००/-रु कि.चे एक सोन्याची चैन ७ग्रॅम वजनाची जाड वचपटी असलेली जु वा किं अं, २)२४,०००/- रु कि.च्या दोन सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ४ ग्रॅम वजनाच्या जु वा किं अ<br>३)०९,०००/- रु कि.ची एक सोन्याचे ब्रेसलेट ३ ग्रॅम वजणाचे जु. वा किं अ., ४) ६०००/- रु कि.ची एक पेडेन्ट २ ग्रॅम वजणाचे जु वा किं अ असे एकूण ६०,०००/- रु सोन्याचे दागीने त्यांची कामवाली मुलगी |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपीत हिने तीचे संमतीशिवाय स्वतः चे फायदया करीता लबाडीच्या इरादयाने, चोरी केली आहे.म्हणुन गुन्हा दाखल. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि रवींद्र मुदळ ८०८०६१९२८६ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १२७०/२०२२ भा.दं.वि.कलम ३०४(अ),२७९, ३३७,३३८ मो वा काक १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०९/०८/२०२२ रोजी २३/४५ वाजता सेहगल मोटर शोरूम समोर पुणे नाशिक हायवे रोड ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | १०/०८/२०२२ रोजी ११/१३ वा |
| फिर्यादी | :- | राम नामदेव गोरे वय ५२ वर्षे राहणार महात्मा फुले चौक रूप सागरच्या पाठीमागे चाकण तालुका खेड जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | दत्तात्रय दिलीप सावंत वय ३२ वर्ष राहणार चांडोली तालुका खेड जिल्हा पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादीचा सहकारी वॉचमन कल्याण धोंडीबा हाके हा सेहगल मोटर शोरूम समोर पुणे नाशिक हायवे रोड क्रॉस करीत असताना त्यास दुधाची गाडी टेम्पो नंबर एम एच १४ ए एस ३३ ५५ ही वरील चालक आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील वाहन वेगात चालवून कल्याण धोंडीबा हाके यांचा अपघात करून अपघातात त्यांच्या डोक्याचे लहान-मोठ्या गंभीर स्वरूपाच्या दुखापती करून त्यांचे मरणास कारणीभूत झाला म्हणून गुन्हा दाखल. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि बामणे ९६३७६४६५४७ |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३७२/२०२२ भादवी कलम ४०६,४२०,३४ सह कलम ४,५ महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधिल) हितसंबंधाचे संरक्षण अधि.१९९९ अन्वये |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २७/०२/२०२० ते १०/०८/२०२२ रोजी १२/०० वा. बालाजी मोबाईल शॉपी तेली आळी तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | १०/०८/२०२२ रोजी १९.४० वा. |
| फिर्यादी | :- | जितेंद्र शंकर षिंदे, वय ५२ वर्षे, धंदा- जय बालाजी फायनान्स व जमिन खरेदी विक्री व्यवसाय, रा.ठी.-साईनाथ कॉलनी, ९१२/०८, तेली आळी, तळेगाव दाभाडे, जि. पुणे |
| आरोपी | :- | १)जेबीसी कंपनीचे संचालक राहुल गुलाबसिंग जाखड, रा. बी झोन ऑफिस नं.३०४ तिसरा मजला जयहिंद कलेक्शन शेजारी मुंबई पुणे हायवे चिचंवड पुणे , २)रामहरी ज्ञानदेव मुंडे रा. बी झोन ऑफिस नं.३०४ तिसरा मजला जयहिंद कलेक्शन शेजारी मुंबई पुणे हायवे चिचंवड पुणे,<br>३)राहुल याची पत्नी महीला आरोपी रा. बी झोन ऑफिस नं.३०४ तिसरा मजला जयहिंद कलेक्शन शेजारी मुंबई पुणे हायवे चिचंवड पुणे ,तसेच,<br>४)ऑफिस प्रमुख महीला आरोपी बी झोन ऑफिस नं.३०४ तिसरा मजला जयहिंद कलेक्शन शेजारी मुंबई पुणे हायवे चिचंवड पुणे.<br>**अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळ व ठिकाणी जे.बी.सी कॅपीटल प्राय. लिमी. व जेबीसी अँग्रोटेक कंपनीचे संचालक राहुल जाखड व रामहरी मुंडे यांनी त्यांच्याकडे शेअरमार्केटमध्ये पैसे गुंतवणुक करण्याकरीता चांगला परतावा मिळवुन देतो असे अश्वासन देवुन त्याप्रमाणे फिर्यादी सोबत लेखी अँग्रीमेंट करून दिले. व त्यावर फिर्यादीस विश्वास ठेवण्यास भाग |

पाडुन फिर्यादीस रू. ५९.५० लाख गुंतवणुक करण्यास भाग पाडले. व त्याचा परतावा म्हणुन रू. ३३,३६,०००/ परतावा व ५९,५०,०००/ मुद्दल असे एकुण ९२,८६,०००/ चे चेक दिले. तसेच फिर्यादीचा मित्र नामे संदीप रमेश शिंदे याच्यासोबत कंपनी लेटरहेड वरती अँग्रीमेंट करून त्याच्याकडुन ही रू. १०,००,०००/- ठेव स्वीकारून आम्हा दोघांनाही कोणताही परतावा न देता फिर्यादी व फिर्यादीचा मित्र यांचा विश्वासघात करून पुण्यातील कंपनीची सर्व ऑफिसेस बंद करून आरोपीत हे दुबई व इतरत्र परागंदा झालेले आहेत. आरोपीत यांनी फिर्यादी व फिर्यादीचे मित्र यांची रू. १,०२,८६,०००/- इतक्या रक्कमेची फसवणुक केल्यामुळे गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पाटील ९१३७२७३४५०

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ६४३/२०२२ भा.दं.वि. कलम ४०६,४२०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २३.०३.२०२२ ते २३.०४.२०२२ दरम्यान सुर्यदर्शन सोसायटी सेक्टर १ इंद्रायणीनगर भोसरी पुणे

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी २२/३७ वा

फिर्यादी :- सचीन विश्वास शिंदे वय ३१ वर्षे रा. द्वारका विश्व सोसायटी जी-३०५ सेक्टर ७ इंद्रायणी नगर भोसरी पुणे

आरोपी :- १)झुमुरनिबास बॅनर्जी वय ५० वर्षे व तिची मुलगी
२)महीला आरोपी वय अंदाजे २५ वर्षे रा सुर्यदर्शन सोसायटी सेक्टर १ इंद्रायणीनगर भोसरी पुणे मुळ गाव कोलकाता (पश्चिम बंगाल)
**अटक नाही.**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी फिर्यादी यांना सुर्यदर्शन सोसायटी सेक्टर १ इंद्रायणीनगर भोसरी पुणे येथील रो हाऊस विक्री करणेबाबत विक्रीचा करार नामा दुय्यम निबंधक हवेली क्र १७ येथे करुन सदरचा रो हाऊस परस्पर दुस-याच व्यक्तीस विक्री करुन फिर्यादीची १३,७०,०००/- (अक्षरीतेरा लाख सत्तर हजार रु) ची फ़सवणुक केलेली आहे, म्हणुन गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- पो उप निरी पवार ९५५२५८०५२६

०९.

पोस्टे व गु.रजि.नं :- सांगवी ३६०/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी), ६६(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २१/०१/२०२२ पासुन ते २३/०७/२०२२ रोजी पर्यंत फिर्यादी याचे राहते घरामधुन.

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी २१.१४ वा

फिर्यादी :- विक्रांत सर्यकांत भोंगळे, वय- ३२ वर्षे, रा. फ्लॅट नं. २०१/४ ए, कल्पतरु इस्टेट, फेज -२, नाशिक फाट्याजवळ, पिंपळे गुरव, पुणे.

आरोपी :- १)लेट्स प्लॅन आऊट कंपनी व
२)जयेश जगदिश मिना रा.उलवे, नवी मुंबई.
**अटक नाही.**

तपशिल :- २१/०१/२०२२ पासुन ते दि. २३/०७/२०२२ रोजी पर्यंत या कालावधी मध्ये फिर्यादी व फिर्यादीची फॅमिली व सोबत दोन मित्र व त्यांची फॅमिली असे एकत्रीत ६ जणांची लेट्स प्लॅन आऊट या कंपनीचे मार्फतीने जयेश

जगदिश मिना रा. उळवे, नवी मुंबई. यानी लेह, लद्दाख व कश्मीर येथील दि. २३/०७/२०२२ ते दि. ३१/०७/२०२२ रोजी पर्यंतचे टुरचे बुकिंग करण्याकामी फिर्यादी व फिर्यादीची पत्नी असे दोघांचे मिळुन ८०,८००/- रुपये ऑनलाईन पध्दतीने फिर्यादी यांनी त्यांचे युपी आय. आय.डी वरुन जयेश मिना यांनी पाठवलेल्या युपीआय आय.डी वर पैसे पाठवुन बुकिंग केले. बुकिंग केल्यानंतर कोणत्याही प्रकारचे एअरलाईन व हॉटेलचे बुकिंग डिटेल्स न देता. टुरला जाण्याचे दिवशी अचानक टुर पुढे ढकलली असल्याचे खोटेकारण सांगतले व त्यांनतर वारंवार फोन करुन फोन न उचलता फिर्यादी व फिर्यादीची पत्नीची टुरचे एकुण ८०,८००/- रुपये घेवुन टुरला न नेता आर्थिक फसवणुक करुन मानसिक त्रास दिलेला आहे. म्हणुन गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि सुनिल तांबे, (गुन्हे), ९८२३०७९८५२

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ७५८/२०२२ भा.दं.वि.कलम-३७०(३),३४ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध का.१९५६ चे कलम.४,५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०९/०८/२०२२ रोजी २०/३० वा. चे सुमारास सर्वे नं- १११ प्लॉट नं-११/१/११/३ एनएच-४ बेंगलोर मुंबई हायवे ता.हवेली जि.पुणे येथील हॉटेल अर्जुन एक्झकेटीव्ह मधील रुम नं २०१ मध्ये

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी ०४.२३ वा.

फिर्यादी :- संगीता रामनाथ जाधव वय ३३ वर्षे मपोना १३७८ नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष पिंपरी चिंचवड

आरोपी :- १) दिलीप सर
२)संजय ऊर्फ रॉकी ऊर्फ अभिराज
३)रॉकी ऊर्फ राज
**अटक नाही**

तपशिल :- नमुद के.ता.वेळी व ठिकाणी आरोपीत हे त्यांचे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी संगणमत करून १)पीडीत महिला वय २३ वर्षे, २) पीडीत महिला वय २५ वर्षे या महिलांना पैशांचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले म्हणुन गुन्हा दाखल.
जप्त माल-
एकुण ३१००/- रु. कि.चा एकुण मुद्देमाल
१) ३,०००/- रु रोख रक्कम
२) १००/- रु किं चे १० मॅनफोर्स कंपनीचे पिंक रंगाचे कॉन्डोम पॅकेट जु.वा.कि.अं

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ६९५/२०२२ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२७, २९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १०/०८/२०२२ रोजी १४.२० वा. चे सुमारास वाकड पोलीस स्टेशनचे हद्दीतील केजुबाई मंदिराचे बाजुला असलेल्या पत्राचे शेडमध्ये

गुन्हा दाखल :- १०/०८/२०२२ रोजी २२.४४ वा.

फिर्यादी :- प्रसाद राजन्ना जंगीलवाड, पोशि/१४८६ अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं. चिं.

आरोपी :- १)धिरज खंडु भालेराव, वय २० वर्षे, रा ड्रायव्हर कॉलनी, अशोकनगर, काळेवाडी फाटा, पुणे,
२)महेश बाबुराव पाटिल, वय २२ वर्षे, रा लेन क्र ४, दत्तनगर, थेरगाव, पुणे
३)सोनु राजन तेलंग, वय २४ वर्षे, रा रहाटणीफाटा, नखातेनगर, श्रीकृष्ण कॉलनी, पुणे **(फरार)**
४)इम्रान शेख, रा वेताळनगर, पुणे
**आरोपी क्र.१ व २ अटक आहे**

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी आपले कब्जामध्ये २००/- रु. किंमतीचा १५ ग्रॅम गांजा व गांजा ओढण्याचे साहित्य किंमत ००-००/- रु. असा एकुण २००/- रु.चा माल अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या जवळ बाळगुन आपले ताब्यातील चॉकलेटी रंगाचे चिनी मातीचे चिलीममध्ये गांजा भरुन त्यातुन येणारा धुर ओढत असताना व सेवन करताना मिळुन आले त्यांनी सदरचा गांजा त्यांचा मित्र नामे इम्रान शेख, रा वेताळनगर, पुणे याचेकडुन घेतला असल्याचे सांगितले आहे. म्हणुन गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि अतुल जाधव ७५०७४५५२९४